फौ किरकोळ अर्ज.क्र. ५४/२०२६

Exh. 8/C

कागल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो....
यांचे न्यायालयात.....

Order
A.P.P. to say

J.M.F.C.
08.06.2026

संदीप अण्णाप्पा ठिकणे — अर्जदार

विरुद्ध

राज्य उत्पादन शुल्क विभाग — वि.प

<u>दुरुस्ती अर्ज</u>

**यातील अर्जदार तर्फे विनंती अर्ज असा कि,**

१) अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज गु.र.नं. ८/२०२६ चे कामी त्यांच्याकडून जप्त केलेले मुद्देमाल परत मिळणे करिता केलेला आहे.

२) अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेला मुद्देमाल क्र. १ मोबाईल फोनची मालकी हक्काने मागणी केलेली आहे.

३) सदर मोबाईल फोन (मुद्देमाल) हा मागणी करते समयी अर्जदार यांनी त्यांचे अर्जामध्ये नजरचुकीने मुद्देमाल ब म्हणजेच सदर मोबाईल मधील ९३७२५५२७२७ या क्रमांकाचे तसेच जियो या कंपनीचे सिम कार्ड यास मुद्देमाल ब असे नमूद केले आहे. सदर गु.र.नं.०८/२०२६ चे कामी सदर मोबाईल मध्ये असणारे जियो या कंपनीचे सिम कार्ड हे सदर गुन्ह्याचे कामी वेगळे परिशिष्ट म्हणून सादर केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जामध्ये मुद्देमाल ब हा मजकूर वगळणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

४) अर्जातील विषयाबाबत संपूर्ण गुणदोषांवर उकल होणेसाठी अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे अत्यंत आवश्यक आहे.

५) प्रस्तुतचा अर्ज मंजूर झाल्यास वि.प यांचे कोणतेही कायदेशीर नुकसान होणार नाही मात्र प्रस्तुत अर्ज नामंजूर झाल्यास अर्जदार यांचे कायदेशीर अधिकार नाहक डावलले जावून अर्जदार यांचे कधीही न भरून येणारे असे अपरिमित कायदेशीर नुकसान होणार आहे.

६) **सबब, वादी यांनी मे. कोर्टास नम्र विनंती की,**

अ) अर्जदार यांचा प्रस्तुतचा दुरुस्ती अर्ज मंजूर करणेत यावा.

आ) जरूर तर अर्ज दुरुस्तीस परवानगी असावी.

इ) न्यायाचे इतर हुकुम याच कामी अर्जदार यांचे बाजूने व्हावेत.

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.06.08 17:15:26 +0530

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

कागल

ता.०८/०६/२०२६

## ॲफिडेव्हीट

मी यातील अर्जदार संदीप अण्णाप्पा ठिकणे, व.व ४५, धंदा.व्यवसाय, रा.चिंचवाड, ता.करवीर, जि.कोल्हापूर या लेखाने देवाच्या शपथेवर असे नमूद करतो कि, वरनमूद अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे पूर्णपणे खरा व बरोबर आहे.म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु.कोल्हापूर. ता.०८/०६/२०२६

I know the Proponent

Adv. P.M. Chandur

## प्रतिज्ञा

मी उपरोक्त ॲफिडेव्हीट करणार सत्य प्रतिज्ञेवर असे नमूद करतो की, वरनमूद अर्जातील व त्याखालील ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे पूर्णपणे खरा व बरोबर आहे.म्हणून केली प्रतिज्ञा आज मु.कोल्हापूर ता.०८/०६/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri Sandeep Annappa Tikane
Age 45 of Chinchawad who is [illegible]
identified by Shri Adv. P.M. Chandur
............whom I know personally
Dated :- 8/6/26

Assistant Superintendent